# बालशिक्षणाची तत्वविचारधारा

बालवयातील शिक्षण खूप महत्त्वाचे आहे; ते काळजीपूर्वक केले पाहिजे आणि त्यासाठी प्रथमतः मूल समजावून घेतले पाहिजे. निसर्गतः मूल कसे असते आणि कसे वाढते याचे आकलन करून घेतले पाहिजे, म्हणजे मगच त्याचे शिक्षण त्याला अनुरूप असे कसे करता यईल हे ठरवता येईल. याविषयीच्या विचाराचा इतिहास मोठा आहे. अनेक शतकांचा आहे.

बालशिक्षण विचाराच्या इतिहासाचा मूळ धागा हा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामधून पुढे आलेला आहे. अगदी सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीच्या पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या ग्रीक प्रणालीशी त्याचा मूळ धागा जोडलेल । आढळतो. 'प्लेटोचा (इ.स.पूर्व ४२७ ते ३४७ ) 'रिपब्लिक' हा नागरीशिक्षणातील एक चांगला ग्रंथ मानला जातो.' कारण, त्याने शिक्षणाचा विचार केवळ व्यक्ती म्हणून नव्हे, तर चांगला नागरिक घडविण्याच्या अंगाने केलेला आढळतो. अत्यंत तर्कशुद्ध विचार हे प्लेटोच्या एकूणच विचारांचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे बालकांचा नि त्यांच्या शिक्षणाचा त्याने मांडलेला विचारही या वैशिष्टयाला अपवाद नाही.

व्यक्तीच्या दृष्टीने चांगल्या जीवनाची संकल्पना म्हणजे बुद्धिनिष्ठतेने जगण्याची संकल्पना, प्लेटोला अभिप्रेत होती. त्यामुळे, शिक्षणाचे कार्य हे अशी बुद्धिनिष्ठतेने व्यवहार करणारी माणसे घडविण्याचे आहे; अशी भूमिका त्याने घेतली आहे. (प्लेटोचा आग्रह हा दर्जात्मक कार्याचा आणि म्हणून दर्जात्मक कार्य करणारी माणसे घडविण्याचाही होता !) बालकांच्यात निसर्गतःच खूप क्षमता असतात, आणि त्यांना योग्य वळण देऊन त्यांमधून उत्तम प्रौढ घडवता येतात; बालकांमध्ये बुद्धिमत्ता वेगवेगळया असतात, आणि हे समजावून घेतलेल्या, चांगले प्रशिक्षण झालेल्या व्यक्तींच्या हातीच मुलांचे शिक्षण सोपवावे, असे प्लेटोने म्हटले आहे.

प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल (इ.स.पूर्व ३४८ ते ३२२ ) याने नैतिक शिक्षणाचा आग्रह धरला आहे. त्याचे म्हणणे असे, की मुले नैतिकदृष्टया चांगली अथवा नैतिकदृष्टया वाईटही घडू शकतात, आणि अशा दोन्ही प्रकारच्या क्षमता मुलांमध्ये उपजतच असतात. प्लेटोप्रमाणेच ॲरिस्टॉटलचेही म्हणणे असे आहे, की मुलांचे शिक्षण ही चांगला मनुष्य घडविण्याची प्रक्रिया आहे; आणि त्यासाठी स्वतः शिक्षक चांगला प्रशिक्षित असावा लागतो. शिक्षकाचे काम बालकांना योग्य वृत्तीकडे वळविण्याचे असते, मुलांना चांगल्या कृती करायला लावून त्यांना घडविता येते, अशी कल्पना ॲरिस्टॉटलने मांडली आहे.

माँटेग्यू (इ.स.१५३३ ते १५९२ ) आणि फॅन्सिस बेकन (इ.स.१५६१-१६२६) या दोघांनीही, मुलांनी स्वतःच्या अनुभवांच्या आधारे 'करून शिकण्या' वर भर दिला आहे. शिक्षण डोक्यावर हाणण्याच्या प्रकाराबद्दल त्यांनी असमाधान दर्शविलेले आहे. या तात्त्विक मुददयांना सविस्तरपणे भिडणारा पहिला शिक्षण – तत्त्वज्ञ

म्हणजे जॉन ॲमस कोमेनिअस (इ.स.१५९२ ते १६ ७०) हा आहे. मुलांनी, आपल्याला जे कळलेले नाही ते नुसते घोकून पाठ करू नये, असे कोमेनिअसने धाडसाने बजावले आहे. मुले

'वस्तू' पाहून 'शब्द' शिकत असतात. त्यामुळे त्यांना मूर्त वस्तू दाखवून शिकवले पाहिजे, वेगवेगळे, रंग गंध - स्पर्धांचे अनुभव देऊन शिकवले पाहिजे अशी आजच्या शास्त्रीय बालशिक्षणाशी सुसंगत अशी मते कोमेनिअसने लॉकने मांडली आहे.निसर्ग हीच फार मोठी शाळा आहे, असेच बेकनप्रमाणे कोमेनिअसचेही मत होते, त्यामुळे त्याच्या शिक्षणरचनेत निसर्गशिक्षणाला मोठे स्थान होते. कोमेनिअसचे महत्त्वाचे कार्य म्हणजे, त्याने सर्वांनाच शिक्षण मिळावे, असा शिक्षणाच्या सार्वत्रिकतेचा विचार पहिल्यांदाच मांडला; तसेच वयोमानानुसार शिक्षणाच्या इयत्ताही त्याने ठरविल्या. त्यांपैकी पहिली सहा वर्षे बालकांचे शिक्षण घरीच आईच्या शाळे 'त व्हावे, असे म्हटले. आणि याच शाळेत, जीवनाचा पाया घालणारे शिक्षण दिले जावे ; सर्व कलांच्या नि शास्त्रांच्या अभ्यासाची सुरूवात, याच 'घरगुती ' शाळेत व्हावी, आणि हे सर्व प्रत्यक्ष पाहून, अनुभव घेऊन, स्वतःच्या हातांनी करून, मुले शिकतील अशी व्यवस्था कोमेनिअस देतो.

सहा वर्षांपर्यंतचे बालवय हे अतिशय महत्त्वाचे वय असून, या वयात बालकाच्या आरोग्याची नि शिक्षणाची काळजी घेतली पाहिजे; आणि मुख्य म्हणजे या वयातील बालकांचे शिक्षण अगदी सहजपणे झाले पाहिजे, मारून मुटकून होता कामा नये, असे कोमेनिअस सांगतो "पक्षांना जसे सहजपणे, उडता येते, माशांना पोहता येते आणि प्राण्यांना बागडता येते, " इतक्या सहजपणे मुलांना शि कता आले पाहिजे, असे कोमेनिअसच्या शब्दांतच आपल्यालाही म्हणता येईल.

मानसशास्त्राचा जन्म होण्यापूर्वी दोनशे वर्षे, बालकांच्या मानसातील फरक विचारांत घेऊन, त्यांच्या त्यांच्या क्षमतांनुसार शिक्षणाची आखणी केली जावी, असे म्हणणारा कोमेनिअस हा तत्त्वज्ञ होता. मुलांच्या क्षमता नि त्यांचा कल विचारात घेऊन त्यांनुसार शाळांमधील साहित्य आणि शिकविणे यांचा वापर केला जावा असा मानसशास्त्रीय मंत्र त्याने इतक्या पूर्वीच देऊन ठेवला आहे.

जॉन लॉक (इ.स.१६३२ - १७०४ ) हा असाच एक प्रभावी तत्त्वज्ञ, ज्याने लहान मुलांच्या शिक्षणाच्या संदर्भात शारीरिक शिक्षणाचे महत्त्व आवर्जून सांगितले (नीतिशास्त्राचा प्राध्यापक झालेला हा तत्त्वज्ञ आपल्या हौसेखातर वैद्यकीय पदवी घेतलेला शिक्षणतज्ज्ञ होता!) 'सम थॉटस , कन्सर्निंग एज्युकेशन ' हा जॉन लॉकचा, पाश्चात्य शिक्षणावर दीर्घकाल प्रभाव पाडणारा प्रसि द्ध ग्रंथ. या ग्रंथाची सुरूवातच मुळी पुढील प्रसिद्ध विधानाने झाली आहे. अशा त-हेची बालकाच्या शारीरिक नि मानसिक आरोग्यबाबतची भूमिका मांडली.

बालकांच्या लहान वयातील नैसर्गिक क्षमतांचा उल्लेख इतर तत्त्वज्ञांप्रमाणे लॉकनेही केला आहे. विशेषतः मुलांमध्ये एक नैसर्गिक जिज्ञासा असते, आणि तिच्याकरवी मुले आपला बौद्धिक विकास स धित असतात. मात्र खरे ज्ञान हे तार्किक विचारशक्तीतून येते आणि लहान मुले अजून या क्षमतेसाठी तयार व्हायची

असतात. त्यामुळे, त्यांच्याबाबतीत प्रौढांनी लक्ष घालून त्यांना चांगल्या सवयी मात्र लावाव्यात, असेही लॉक म्हणतो. लॉकच्या दृष्टीने शिक्षणात शिस्तीचे महत्त्व आहे. परंतु त शारीरिक, नैतिक आणि बौद्धिक अशाप्रकारच्या तिहेरी चांगल्या सवयींसाठी, साधनभूत म्हणून केवळ आहे; असे म्हणता येईल. शिस्तीसाठी शारीरिक शिक्षांच्या वापराला मात्र त्याने पाठिंबा दिलेला नाही. शारीरिक शिक्षा विद्यार्थ्याला करावी लागणे हे शिक्षकाचे अपयश आहे, असे त्याने सा गून ठेवले आहे. शिक्षण हे आनंददायी असले पाहिजे. मुलांना त्यात रस वाटला पाहिजे. त्यासाठी लहान वयातील शिक्षण हे खेळाशी जोडले पाहिजे. लहान मुलामुलींना बाहुल्या व इतर खेळणी स्वतःच तयार करायला देऊन 'कृतीतून शिक्षण ' घेण्याची संधी दिली पाहिजे, असे तो म्हणतो. एका अर्थाने पुढील शतकात निर्माण झालेल्या 'खेळण्यातून शिक्षण ' किंवा 'कृतिद्वारे शिक्षण ' या पद्धतींचा तात्त्विक पातळीवरील विचार जॉन लॉकच्या शिक्षणविषयक विचारांमध्ये आलेला आहे असे म्हणता येईल.

❖